# <u>प्रसिद्धीपत्रक</u>

**मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रात सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत माहे, डिसेंबर-२०१२ साठी कौटुंबिक शिधापत्रिकेवर देय असलेल्या नियंत्रित शिधाजिन्नसांचे परिमाण व दर पुढीलप्रमाणे आहेत.**

---

**१. <u>ए.पी.एल.</u>-** ए.पी.एल. शिधापत्रिकाधारकास वितरीत करावयाच्या धान्याचे परिमाण प्रति शिधापत्रिका प्रतिमाह एकूण १५ किलो, त्यापैकी ५ किलो तांदूळ रु.९.६० प्रती किलो व १० किलो गहू रु.७.२० प्रती किलो, असे आहे. मात्र ए.पी.एल. शिधापत्रिकाधारकास फक्त गहूच हवे असल्यास १५ किलोपर्यंत गहू घेता येईल.

२. **<u>बी.पी.एल.</u>**- (अ) बी.पी.एल. योजनेच्या प्रत्येक शिधापत्रिकाधारकास वितरीत करावयाच्या धान्याचे परिमाण प्रतिमाह एकूण ३५ किलो असून त्यापैकी २५ किलो तांदूळ रु. ६.०० प्रतिकिलो व १० किलो गहू रु. ५.०० प्रतिकिलो, असे आहे. सदर शिधापत्रिकाधारकांना बी.पी.एल. दराचे ३५ किलो धान्य महिन्यामध्ये एकाचवेळी उचलणे शक्य नसल्यास त्यांना ते धान्य दोन टप्प्यांमध्ये घेता येईल.

(ब) बी.पी.एल. योजनेच्या लाभार्थ्यांना, उपरोक्त परिमाणाव्यतिरिक्त प्रतिमाह प्रति शिधापत्रिका ५ किलो धान्य त्यापैकी १ किलो तांदूळ व ४ किलो गहू या परिमाणानुसार तांदूळ रु. ६.०० प्रतिकिलो व गहू रु. ५.०० प्रतिकिलो, दराने तदर्थ/अतिरिक्त नियतनाचे वितरण करण्यात येईल.

उपरोक्त (अ) व (ब) नुसार बीपीएल योजनेच्या लाभार्थ्यांना माहे डिसेंबर, २०१२ मध्ये प्रति शिधापत्रिका, नियमित व तदर्थ/अतिरिक्त धान्य असे एकूण (३५+५)= ४० किलो धान्य वितरीत करण्यात येईल.

**३. <u>अंत्योदय</u>** - (अ) अंत्योदय अन्न योजनेचे लाभार्थी असे शिक्के मारलेल्या प्रत्येक शिधापत्रिकेवर वितरीत करावयाच्या धान्याचे परिमाण प्रतिमाह एकूण ३५ किलो असून त्यापैकी २५ किलो तांदुळ रु. ३.०० प्रतिकिलो व १० किलो गहू रु. २.०० प्रतिकिलो, असे आहे. अंत्योदय अन्न योजनेचे ३५ किलो धान्य दोन टप्प्यांमध्ये घेण्याची शिधापत्रिकाधारकांना मुभा असून जे शिधापत्रिकाधारक सदर धान्य एका टप्प्यात घेऊ इच्छित असतील, त्यांना ते एकाच टप्प्यात सुद्धा घेता येईल.

(ब) अंत्योदय योजनेच्या लाभार्थ्यांना, उपरोक्त परिमाणाव्यतिरिक्त प्रतिमाह प्रति शिधापत्रिका ५ किलो धान्य त्यापैकी १ किलो तांदूळ व ४ किलो गहू या परिमाणानुसार तांदूळ रु. ६.०० प्रतिकिलो व गहू रु. ५.०० प्रतिकिलो, या **<u>बी.पी.एल. दराने</u>** तदर्थ/अतिरिक्त नियतनाचे वितरण करण्यात येईल.

उपरोक्त (अ) व (ब) नुसार अंत्योदय योजनेच्या लाभार्थ्यांना माहे डिसेंबर, २०१२ मध्ये प्रति शिधापत्रिका, नियमित धान्य अंत्योदय दराने व तदर्थ/अतिरिक्त धान्य बीपीएल दराने असे एकूण (३५+५)= ४० किलो धान्य वितरीत करण्यात येईल.

**४. <u>अन्नपूर्णा</u>** - केंद्रिय अन्नपूर्णा योजनेअंतर्गत ६५ वर्षावरील निराधार व्यक्तिना वितरीत करावयाच्या धान्याचे परिमाण प्रतिमाह १० किलो (त्यापैकी तांदूळ ५ किलो व गहू ५ किलो ) असे आहे. सदर १० किलो धान्य हे संपूर्णत: मोफत आहे.

**५. <u>साखर</u>** - दारिद्र्य रेषेखालील पिवळ्या शिधापत्रिकाधारकांसाठी माहे डिसेंबर -२०१२ करिता साखरेचे मासिक परिमाण दरमाणशी ५०० ग्रॅम साखर रु. १३.५० प्रतिकिलो, असे आहे. ज्या पिवळ्या शिधापत्रिकाधारकांना माहे नोव्हेंबर -२०१२ चा साखरेचा कोटा मिळाला नसेल, त्यांना तो कोटा माहे डिसेंबर -२०१२ मध्ये घेता येईल.

६. **केरोसीन -** शासन पत्र दिनांक ५ ऑगस्ट, २००५ अन्वये आश्वासित केरोसीन योजना राबविण्यात आली असून, त्यानुसार माहे डिसेंबर , २०१२ करिता मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रात परिमंडळनिहाय आरंभीची शिल्लक व माहे डिसेंबर, २०१२ साठी शासनाकडून प्राप्त नियतन (३८.४६%) असा एकूण उपलब्ध होणारा (३९.९७%) केरोसीन कोट्यानुसार शिधापत्रिकांवरील देय केरोसीन पुढीलप्रमाणे आहे.

**केरोसीनचे परिमाण**

| माहे नोव्हेंबर, २०१२ अखेर शिल्लक (कि.लि.) | माहे डिसेंबर, २०१२ चे नियतन (कि.लि.) | आश्वासितप्रमाणे शिधापत्रिकाधारकांना देय परिमाण (लिटर) | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १ गॅस | १ व्यक्ती | २ व्यक्ती | ३ व्यक्ती | ४ व्यक्ती | ५ व्यक्ती | ६ व्यक्ती | ७ व्यक्ती व वरील |
| ५५९.७५२ | १४२३२ | २ | २ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |

**केरोसिनचे दर**

मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रातील मुंबई विभागासाठी शासन परिपत्रक क्रमांक रॉकेल-१५१२/प्र.क्र.२०८, ना.पु.२७, दि.२६ जुलै, २०१२ नुसार केरोसिनचा दर प्रती लिटर **रु.१४.४४** असा आहे.

ठाणे विभागासाठी ठाणे जिल्हाधिकारी यांनी ठरवून दिलेल्या दरानुसार उप नियंत्रक शिधावाटप, 'फ' परिमंडळ यांचे पत्र क्रमांक फप/केरो/२०१२/कावि.२१२/जा.३५२३, दिनांक ३०/०७/२०१२ नुसार केरोसीनचे दर पुढीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | शिधावाटप कार्यालय | क्षेत्र | दर |
|---|---|---|---|
| १. | ठाणे विभाग (३६/फ, ४१/फ, ४८/फ) | ठाणे म.न.पा. क्षेत्र | १४.६३ |
| २. | ४१/फ वाशी | ठाणे म.न.पा. क्षेत्र वगळून | १४.५० |
| ३. | ४१/फ भाईंदर | मिरा भाईंदर म.न.पा. क्षेत्र | १४.६७ |
| ४. | ३८/फ कल्याण | कल्याण डोंबिवली म.न.पा. क्षेत्र | १४.५९ |
| ५. | ३९/फ डोंबिवली | कल्याण डोंबिवली म.न.पा. क्षेत्र वगळून | १४.५९ |
| ६. | ४०/फ उल्हासनगर | उल्हासनगर म.न.पा. क्षेत्र | १४.६३ |
| ७. | ४०/फ (उप) उल्हासनगर | | |
| ८. | ४६/फ (अंबरनाथ), ४६/फ (बदलापूर) | उल्हासनगर (बिगरजकात क्षेत्र) | १४.६३ |
| ९ | ३७/फ भिवंडी | म.न.पा. क्षेत्र | १४.६९ |
| १०. | | म.न.पा. क्षेत्र वगळून | १४.५५ |

शासनाकडून प्राप्त होणारे मासिक नियतन, दर अथवा परिमाणात बदल झाल्यास त्यानुसार कार्यवाही करण्यात येईल.

सही/-
**नियंत्रक शिधावाटप व**
**संचालक नागरी पुरवठा,**
**मुंबई.**

C:\Documents and Settings\NanduC\Desktop\Website Infromation\Prasiddhipatrak\Prasiddhipatrak Dec-12.doc

**क्र.निशि/मागणी/१०२०१२/दोन/जा.९८२**
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
एक्सप्रेस इमारत, २ रा मजला,
चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०.

दिनांक : ११/१२/२०१२

**प्रति,**

महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांस वरील वृत्तास व्यापक प्रसिध्दी देण्याच्या विनंतीसह सस्नेह अग्रेषित.

सही/-

**नियंत्रक शिधावाटप व**
**संचालक नागरी पुरवठा,**
**मुंबई.**

**प्रत माहितीस्तव अग्रेषित :-**

१. मा. राज्यमंत्री, अनापु व ग्रासंवि आणि साबांवि, मंत्रालय, मुंबई.
२. मा.खासदार, सर्व मुंबई/ठाणे शिधावाटप क्षेत्र, ( संबंधीत परिमंडळामार्फत )
३. मा.आमदार, सर्व मुंबई /ठाणे शिधावाटप क्षेत्र, ( संबंधीत परिमंडळामार्फत )
४. मा.महापौर, मुंबई, नवी मुंबई, ठाणे,कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर, भिवंडी, मिरा-भाईंदर महानगरपालिका (संबंधीत परिमंडळामार्फत)
५. मा.आयुक्त, महानगरपालिका, मुंबई, नवी मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर, भिवंडी, मिरा-भाईंदर महानगरपालिका (संबंधीत परिमंडळामार्फत )
६. मा.नगराध्यक्ष, अंबरनाथ, बदलापूर. ( संबंधीत परिमंडळामार्फत )
७. उपसचिव, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, ४२ सर वि.ठा.मार्ग, मुंबई
९. कार्यासन अधिकारी, कार्यासन क्र.२२ व २८ अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय,मुंबई
१०.पर्यवेक्षक अधिकारी, श्रम मंत्रालय,७१ बी श्रम साफल्य, एन.जी.आचार्य मार्ग, चेंबूर, मुंबई ७१.
११. रेशनिंग कृती समिती, आर.एच.४, सी-४, लेन-८, सेक्टर-९, सी.बी.डी., बेलापूर, नवी मुंबई-४००६१४
१२. श्री. रेडकर संघटक, घरकाम मोलकरीण संघटना, भुपेश गुप्ता भवन, ८५-सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई.
१३. घरकाम मोलकरीण संघटना, मुंबई जिल्हा अंधेरी, घन:श्याम पाटील चाळ,एस.व्ही.रोड,अंधेरी (प), मुंबई-५८
१४. विशेष कार्यकारी अधिकारी, कामगार आयुक्तांचे कार्यालय, कामगार भवन, सी-२०, ई ब्लॉक, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पू), मुं-५१.
१५. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सह.पणन महासंघ मर्या.,कनमूर हाऊस, नरसी नाथा स्ट्रीट, मुंबई.
१६. संदीप सुमन,रेशनिंग व जिविका हक्क संघटना, ई-३१, महात्मा गांधी स्मृती वसाहत, जेरबाई वाडीया रोड, परेल, भोईवाडा,मुंबई -१२.

**प्रत आवश्यक त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित :-**

१. उपनियंत्रक शिधावाटप, सर्व परिमंडळ कार्यालये.
२. उप संचालक (गो), संचालनालय नागरी पुरवठा (गो/वा), पुरवठा भवन, परेल, मुंबई.
३. शिधावाटप अधिकारी, सर्व शिधावाटप कार्यालये.
४. सर्व संघटित संस्था, (परिमंडळ कार्यालयामार्फत.)
५. कार्यासन अधिकारी, का.क.३ (साखर), ५ (दक्षता), ६ (केरोसिन), ११ (प्रशासन) व नियंत्रण कक्ष, प्रधान कार्यालय.